युद्धाने भ्रमनिरास



लिन हगिंस कूपर

मराठी: अश्विनी बर्वे



१९१४ ची गोष्ट आहे जेव्हा एक १६ वर्षाच्या ब्रिटिश मुलाला सिडनीला, जर्मनीशी लढण्याची इच्छा होती. सैन्यात भरती होण्याची आणि महान युद्धात लढण्यासाठी जाणाऱ्या शूर लोकांमध्ये त्याला सामील होण्याची इच्छा होती. पण लवकरच त्याला युद्धाचे सत्य आणि त्यातल्या भयानकतेची जाणीव झाली. युद्धाच्या खाईत त्याला उंदीर चावतात. घरी पाठवलेल्या सिडनीच्या पत्रामुळे आपल्याला हे कळते की पहिल्या विश्व युद्धात त्याचा भ्रमनिरास कसा झाला.



युद्धाने भ्रमनिरास



लिन हगिंस कूपर

चित्र: जान हेवुड




युद्धाची घोषणा झाली आहे.

जर्मनीने फ्रांसवर हल्ला केला या बातम्यांनी वर्तमानपत्रे भरली आहेत.

वडील बेचैन आहे. त्यांचे मित्र युद्धात सामील होण्यास तयार आहेत. "राजा आणि देश दोघांसाठी लढणे माणसाचे कर्तव्य आहे." आई जेव्हा कोणाकडून हे ऐके तेव्हा ती स्वयंपाकघरात भांडी आपटत असे.


जर मी मोठा असतो तर! मी ख्रिसमसच्या आधी बरोबर सोळा वर्षाच होईल.पण बाबांचे म्हणणे आहे की युद्ध तोपर्यंत संपेल. वाटते मी जर्मनीशी कधी लढू शकणार नाही.





वडील निघून गेले.

काल रात्री वडील माझ्या खोलीत आले आणि त्यांनी मला सांगितले की ते युद्धावर जात आहेत. माझ्यावर वाकले तेव्हा त्यांच्या तोंडाला तंबाखू आणि बियरचा वास येत होता. आणि त्यांचे डोळे उत्साहाने चमकत होते.



आई आज सकाळी एक शब्दही बोलली नाही. खरेतर तिचे डोळे लाल झालेले होते.

जसा मी कामावर निघालो, आईने माझा हात पकडला आणि मला जवळ घेतले. कोणी मुलाने मला असी बघितले नाही म्हणून मी खुश होतो. देवा! जर मी अजून थोडा मोठा असतो!



मी ठरवले होते की युद्धात सामील होण्याचे. पण आई मला सारखी मनाई करत होती. ज्या क्षणी मी घरात घुसतो,तिची नजर माझ्यावर असते. मी जिथे जातो तिथे मला झेंडे आणि युद्धात सामील होण्याची ठिकाणे दिसतात. असे वाटते की ते मला बोलवत आहेत. वडील नेहमी म्हणत असत की शत्रूच्या धमक्यांना आपण मुह तोड उत्तर दिले पाहिजे. आणि बघ जर्मनी फ्रान्सला नष्ट करण्याचा प्रयत्न करत आहे. वयाच्या बाबत मी खोटं बोलेन. माझी उंची चांगली आहे त्यामुळे भरती होतांना काही अडचण येणार नाही.

पता नहीं अब पिताजी कहाँ होंगे?
पर उन्हें मुझ पर जरूर गर्व होता!


मी भरती होण्यात सफल झालो.

एक क्षण मी थोडासा सटपटलो. भरती करून घेणारा सैनिक माझ्याकडे वरपासून खालपर्यंत बघत होता. आणि जेव्हा मी सांगितले की मी १९ वर्षाचा झालो आहे तेव्हा तो हसला. पण त्याने मला भरती करून घेतले.


प्रशिक्षण कठिण होते. खरेतर माझ्या मासपेशी आता अधिक तंदुरुस्त झाल्या आहेत. पण मी अजूनही आईला पत्र लिहण्याची हिम्मत करू शकलो नाही.

एका मुलाने सांगितले की तो सोळा वर्षाचा आहे. इतर मुलांनी पण काहीसे असेच सांगितले. मग एका मुलाची आई शिबिरात आली आणि तिने सैनिकाची खाट उभी केली.!

बिचाऱ्या जिमचा दावा खोटा ठरला आणि आम्ही त्याला शेवटी तेव्हा पाहिले जेव्हा त्याची आई त्याला रस्त्यावरून घेऊन जात होती आणि त्याचे कान ताठ झाले होते. मला वाटते की जिमची आई स्वतःच एक महिला बटालियन उभी करू शकते जर्मनीशी लढण्यासाठी. त्यानंतर मी गप्प बसलो. बिचारी आई.



आशा आहे माझ्याद्वारे ठेवलेली चिठ्ठी आईला मिळाली असेल.



प्रिय आई,

मी ज्याप्रकारे घर सोडले त्यासाठी मला क्षमा कर. पण कोणत्याही माणसासाठी आपले कर्तव्य निभावणे गरजेचे आहे. आणि तू मला थांबवण्याचा नक्की प्रयत्न केला असता.

मी तुला सांगू शकत नाही की मी कुठे आहे ते कारण सार्जंटच्या अनुसार शत्रूचे हेर माझे पत्र वाचू शकतात. पण मी तुला हे सांगू शकतो की ज्या नावेने आम्हांला इथे आणले ती खूप भयानक होती. घोड्याची व्यवस्था सैनिकांपेक्षा चांगली होती. सैनिक ठासून माश्यासारखे भरले होते आणि तिथे घोड्यांसाठी खूप जागा होती आणि ते त्यांना हवा तेवढा घास खाऊ शकत होते.

नावे नंतर आम्ही एका ट्रेनने प्रवास केला. मला वाटते की ती एक गुरांची ट्रेन होती. यात हसण्यासारखे काही नाही. पण बाकी मुले चांगले आहेत.कदाचित वडील आत्तापर्यंत घरी आले असतील. आशा आहे की तू मला क्षमा करशील. चिंता करू नको. इथे सर्व मुले म्हणत आहेत की आम्ही ख्रिसमस पर्यंत घरी येऊ.

तुझा प्रिय मुलगा,

सिडनी



मी कधीच असा विचार केला नव्हता की असी होईल. जेव्हा आम्ही खंदक खोदण्यास सुरुवात केली, तेव्हा मला ते काम खूप सोप्पे वाटले. खूप मेहनत, मग सिगारेट आणि हसू. ते सगळे काम पुरुषांचे होते.

मग पाऊस सुरु झाला. खूप जोरात पाऊस. खंदकात चिखलाचा तलाव झाला. जेव्हा आम्ही चिखलाच्या प्रवाहातून जात असू तेव्हा पिवळे, खारट पाण्यातून आम्हांला जावे लागे. पण मला विश्वास आहे की ते ठिकाण कधीतरी छान असेल-आपल्या डरहम सारखे. ते कधी हिरव्यागार शेतांनी आणि पक्ष्यांनी भरलेले असेल.पण आता तसे नाही..

मग लढाई सुरु झाली.


आज एका मुलाला गोळी लागली - त्याच्या घोट्या खालचा पाय निघून गेला, बिचारा एका पायाशिवाय घरी गेला. एका बॉम्बने त्याचा पाय उडवला. तो केवळ १९ वर्षाचा होता. आता तो परत कधी काम करू शकणार नाही.

काश तो मी असतो तर



इथे तुम्हांला खूप आवाज ऐकू येतो. बॉम्बस्फोट सतत चालू असतात. एक न संपणारया वादळासारखे. मग आपल्या डोक्यावर विचित्र अशी भुणभुण होते,रागावलेल्या मधमाश्यासारखी. पण त्यांच्यापेक्षा अधिक जोराच्या डंखा सहित. त्या असतात शत्रूच्या गोळ्या.

जोंसीने आज ते खरेदी केले. एका मिनिटानंतर चहात चुना घातल्या सारखा तो कण्हत होता. तो म्हणाला की त्याला ते प्यायचे आहे. त्याने शौचालय साफ करण्याची इच्छा त्याला नव्हती. पुढच्या मिनिटात तो खोकत खाली पडला.त्याच्या डोक्यात एक भयानक आवाज येत होता.मी फक्त एकटक त्याच्याकडे बघत होतो. तो खूप घाबरला होता. मग तो गप्प झाला. मी घरी परत येण्यासाठी काहीही द्यायला तयार आहे.



प्रिय आई,

वर्तमानपत्रातील भीतीदायक बातम्यांवर विश्वास ठेवू नको. परिस्थिती एवढी खराब नाही.

मी चहा बरोबर परत मास खाल्ले-कच्च्या कांद्याबरोबर. तो बेकन इतका चांगला नव्हता. पण तरीही ठीक होता. खूप सारा चहा पिला. आलुबुखार खाल्ले, सफरचंदाचा जॅम खाल्ला.

मला बाबांबाबत काहीच कळले नाही. त्यांनी पत्र लिहले का?

आई माझे तुझ्यावर खूप प्रेम आहे, हे कधी विसरू नकोस.

तसेही, फ्रिट्ज़ रत गेला आहे. म्हणून मी आता लिहणे बंद करतो. आणि हे विसरू नकोस मी ख्रिसमस पर्यंत परत येईल.

तुझा प्रेमळ मुलगा,

सिडनी



जर देव ऐकत असेल तर त्याने आम्हांला मदत करावी. पण मला त्याबाबत शंका आहे. मला माहीत नाही की दोन्ही गोष्टीत वाईट काय आहे - उवा की उंदीर. उवा माझ्या कपड्यांवर येत आहेत आणि माझी त्वचा लाल झाली आहे. शरीराला खाज येत आहे. माझा सहकारी बिली आपल्या खाकी वर्दीने त्यांना चेंबून टाकण्याचा प्रयत्न करत आहे. पण दुसऱ्या उवा त्यांच्या जागा घेत आहेत.

आणि उंदीर इतके बदमाश आहेत की दिवसा उजेडी ते तुमचे खाणे चोरतात. काल रात्री बिलीने एका उंदराला गोळी मारली. तो मांजरा इतका मोठा होता. मी शपथेवर सांगतो, जर माझ्या वडिलांचा टेरियर कुत्रा असता तर त्याने त्या उंदरांना चांगली मजा दाखवली असती.

आशा आहे की वडिलांची परिस्थिती माझ्यापेक्षा अधिक चांगली असेल. मला कुतूहल आहे की आज रात्री ते कुठे असतील?



मी ओलाव्यामुळे आणि आद्रतेमुळे खूप आजारी आहे. आम्ही कितीही घाण पाणी बाहेर काढले, तरी ते खंदकात परत घुसते. आम्ही प्रत्येकवेळी लडखडत आहोत. माझ्या पायांत वेदना आहेत. त्याला "ट्रेंच फुट", आजार म्हणतात. माझ्या पायांतून दुर्गंधी येत आहे. पण इतर सर्व मुलांचे हेच हाल आहेत.

आज जवळच एक गोळा येऊन पडला. ती सगळ्यात विचित्र गोष्ट होती जी मी बघितली. जिथे गोळा येऊन पडला तिथे मातीची एक भिंत उभी राहिली. आणि मग ती भिंत आमच्याकडे येऊ लागली. ती भिंत एका लहरीसारखी आमच्या डोक्यावरून गेली आणि तिने आम्हांला चिखल आणि दगडांनी झाकून टाकले.

जेव्हा चिख्खल मला येऊन धडकला तेव्हा मी बिलीशी बोलत होतो. माझे तोंड चिखलाने भरले. जसे मी माझे डोळे साफ केले, मी बिलीच्या काळया चेहऱ्याकडे बघितले. मी हसू लागलो, पण बिली माझ्याकडे रोखून बघत होता.

बिचारा बिली. एकदम हास्यास्पद. पण बिली आपल्या या जीवनात परत कधी हसू शकणार नाही.

काश मी घरी परत येऊ शकलो तर




खैर, आम्ही "शून्य" ची वाट बघत आहोत. ०८.४५ वाजता आम्ही त्या डोंगरावर असू. अनेक तासांपूर्वी गोळ्या बरसू लागल्या. लवकरच आम्ही पायऱ्या चढून वर जाऊ.

देवा, कृपया मला इथून जाऊ दे. मला मुलांना निराश करायची इच्छा नाही. पण मला खूप भीती वाटते आहे. त्या तोफांकडे धावत जातांना मला स्वतःला एकदम उघडे पडल्यासारखे वाटते. कदाचित शत्रूला सुद्धा असेच वाटत असेल.

मला आशा आहे की तिथे माझ्या नावाची कोणतीच गोळी नसेल. त्या मुलांमधल्या एक वेड्यासारखे करत आहे - तो रडत आहे, हलत आहे आणि एखाद्या लहान मुलासारखे तो आपल्या आईला हाक मारत आहे. आम्ही त्याला दोष देऊ शकत नाही.

जेव्हा प्रत्येक वेळी मी डोळे बंद करतो तेव्हा मला स्वतःला गोल फिरत नृत्य करतांना बघतो. जसे तुम्ही एखादा सैनिक आगीच्या तावडीत सापडल्यावर करतांना बघतात.

जर मी माझ्या आईबरोबर घरी असतो तर. मी लवकरच परत जाईन. खूप वेळ लागणार नाही आई.





माझी प्रिय,

मी लवकरच घरी येईन. मी यप्रेस मध्ये जखमी झालो आहे, पण तू चिंता करू नकोस. कदाचित त्या जखमेच्या कारणानेच मला घरी पाठवतील. परिस्थिती खराब आहे, खूप खराब.

पण माझ्यासाठी आता खेळ संपला आहे.

सिडनीला सांग की मी लवकरच घरी येईन. मला तुमच्या दोघांची खूप आठवण येत आहे.

पण तुम्ही दोघे सुरक्षित आहात हे जाणून माझे धैर्य वाढते.

तुझ्यावर नेहमी प्रेम करणारा पती

पीटर

सिडनी एक युवक होता. त्याचा जन्म काउंटी डरहममध्ये झाला होता, पण बेल्जियममधल्या एका चिखलाने भरलेल्या मैदानात त्याचा मृत्यू झाला. त्याची कहाणी दुःखद आहे. युद्धाचा सिडनीसारख्या लाखो मुलांसाठी सुखद शेवट नव्हता. प्रथम विश्व युद्धात ब्रिटन, जर्मनी, फ्रान्स आणि रशियातील जवळपास सर्वच कुटुंबांनी आपला कोणता न कोणता सदस्य घालवला.

युद्धाच्या सुरुवातीला 'मित्र' बटालियन बरोबर लढण्यासाठी गेले. हा समूह एक विशेष गाव किंवा क्षेत्रातील सर्व युवकांमिळून तयार झाले होते. ज्यामुळे पूर्ण गाव उजाड झाले. आणि तिथे कोनही तरुण मुलगा परत आला नाही.

अनेक तरुणांनी सेनेत सामील होण्यासाठी आपले वय खोटे सांगितले. मरणारा सगळ्यात छोटा सैनिक प्राइवेट जॉन कोंडोन होता, जो केवळ चवदा वर्षाचा होता. पण काही सैनिक तर त्याहून छोटे होते. जेम्स बार्टाबी केवळ तेरा वर्षाचा होता जेव्हा तो सैन्यात सामील झाला.

तुम्ही शहराच्या चारी बाजूला बघा तेव्हा तुम्हांला नक्कीच एखादे युद्ध स्मारक दिसेल. तिथे नाव वाचा आणि त्या गरीब मुलांच्या आणि पुरुषांच्या बाबत विचार करा जे युद्धात मारले गेले. तिथे त्या सर्व शोकाने संतप्त झालेल्या परिवारांच्या बाबत विचार करा जे लोक प्रथम विश्व युद्धात लढले आणि त्यात मारले गेले. महिला सुद्धा मारल्या गेल्या. अनेक महिलांनी नर्स आणि अम्बुलंस ड्रायव्हर म्हणून स्वच्छेने काम केले.पण शेवटी त्यांना भयानक परिस्थितीत मृत्यू आला.





प्रथम विश्व युद्धात ९०८३७१ ब्रिटिश लोक मारले गेले आणि २,०९०२१२ जखमी होऊन घरी परतले. अनेक पुरुषांना भयानक जखमा झाल्या आणि 'शेल शॉक' च्या बरोबर त्यांना नवीन जीवन सुरु करावे लागले. त्यांना युद्धातील आवाज आणि भयानकते मुळे मानसिक आजार सहन करावे लागले

प्रथम विश्व युद्ध, किंवा 'महायुद्ध', यासाठी म्हटले जाते कारण त्यामुळे सर्व युद्ध समाप्त झाले असे मानले जाते. पण दुर्दैवाने १९३९ मध्ये अजून एक भयानक युद्ध लढले गेले ज्यात परत हजारो लोकांचे प्राण गेले.

